**ठळक बातम्या**

- २००८ मधल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी सात आरोपींची ठोस पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता

- छत्रपती संभाजीनगर ते परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- अमेरिका आणि भारत यांच्यात समतोल व्यापार करारासाठी चर्चा सुरू असल्याचं वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांचं संसदेत निवेदन

आणि

- इंग्लंड विरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या शेवटच्या सामन्यात भारताची खराब सुरुवात

**<><><><>**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात सर्व सात आरोपींची आज विशेष एनआयए न्यायालयाने ठोस पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली. सुमारे १७ वर्षे चाललेल्या या प्रदीर्घ खटल्यानंतर न्यायालयाने हा आदेश दिला. आरोपींमध्ये माजी खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांचा समावेश आहे. सरकारी वकिलांनी कोणताही ठोस पुरावा सादर न केल्यामुळे सर्व आरोपींना निर्दोष मुक्त करत असल्याचं विशेष न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी आपल्या निकालात नमूद केलं. २००८ मध्ये नाशिक जिल्ह्यात मालेगाव इथं हा बॉम्बस्फोट झाला होता. त्यात सहा जणांचा मृत्यू झाला, तर १०० हून अधिक जण जखमी झाले होते. या प्रकरणाचा सुरुवातीचा तपास एटीएस अर्थात दहशतवाद विरोधी पथकानं केला होता. या प्रकरणी १२ जणांना अटक झाली होती. त्यानंतर हा तपास एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवण्यात आला होता. या प्रकरणातला अंतिम युक्तिवाद एप्रिल २०२४ मध्ये संपला आणि न्यायालयानं १९ एप्रिल रोजी या खटल्याचा निकाल राखून ठेवला होता.

खटल्यातल्या १२ आरोपींपैकी ३ जणांची यापूर्वीच निर्दोष सुटका झाली होती. तर दोन आरोपींवर फक्त शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत खटला चालवला जाईल, असं न्यायालयानं आज स्पष्ट केलं.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३१ जुलै २०२५ - गुरूवार

**<><><>**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाच्या निकालावर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दहशतवाद कधीच भगवा नव्हता आणि नसेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

- **- होल्ड - मुख्यमंत्री- -**

दहशतवादाला रंग नसतो, अशी प्रतिक्रीया काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात दिली आहे. निकालाविषयी बोलताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

- **- होल्ड - पृथ्वीराज चव्हाण - -**

२००६मधे मुंबईतल्या उपनगरीय गाड्यांमधे झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाविरोधात राज्यसरकारनं सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे, त्या धर्तीवर मालेगाव स्फोट खटल्यातल्या एनआयए न्यायालयाच्या निर्णयाला राज्यसरकार आव्हान देणार का? असा प्रश्न काँग्रेसने उपस्थित केला आहे.

**<><><>**

मालेगावात या निकालानंतर संमिश्र प्रतिक्रीया उमटल्या. हिंदुत्ववादी संघटनांनी निकालाचं स्वागत करत जल्लोष केला. शहराच्या पूर्व भागात या निकालाचा निषेध करण्यात आला. मालेगाव बॉम्बस्फोटात मरण पावलेल्यांच्या कुटुंबांनी निर्णयामुळे निराश झाल्याचं सांगितलं. या निकालाविरोधात उच्च न्यायालय**,** सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा आपला मनोदय असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं छत्रपती संभाजीनगर ते परभणी दरम्यान रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला मंजुरी दिली आहे. त्यासाठी सुमारे २ हजार २०० कोटी रुपये खर्च येणार आहे. याशिवाय इटारसी - नागपूर दरम्यान सुमारे साडे ५ हजार कोटी रुपये खर्च करुन चौथा रेल्वे मार्ग टाकला जाणार आहे. माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. प्रधानमंत्री कृषी संपदा योजनेसाठी सुमारे साडे ६ हजार कोटी रुपये आणि National Cooperative Development Corporation ला २ हजार कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णयही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज घेतला.

**<><><>**

बिहारमधल्या मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षण विषयावर चर्चेची मागणी करत विरोधी पक्षांनी केलेल्या घोषणाबाजीमुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब झालं. आज सकाळी कामकाज सुरू झाल्यापासून लोकसभा दोन वेळा तर राज्यसभा तीन वेळा तहकूब झाली.

अमेरिकेनं भारतावर लादलेल्या २५ टक्के आयात शुल्काबाबत वाणिज्य मंत्री **पीयूष गोयल** यांनी संसदेत निवेदन केलं. अमेरिकेनं भारताच्या निर्यातीवर केलेल्या शुल्कवाढीच्या परिणामांची तपासणी सरकार करत असून देशाचं हित जपण्यासाठी आवश्यक पावलं उचलली जातील, असं त्यांनी सांगितलं. याविषयी शेतकरी, उद्योजक, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग संस्थांशी चर्चा केली जाईल, असंही गोयल म्हणाले.

- **Hold byte goyal -**

अमेरिका आणि भारत यांच्यात समतोल, दोघांनाही फायदा होईल असा व्यापार करार करण्यासाठी गेल्या काही महिन्यापासून दोन्ही देशात चर्चा सुरू आहे, असंही त्यांनी सांगितलं. भारतीय अर्थव्यवस्था बुडित निघालेली आहे, या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्याचं त्यांनी खंडन केलं. भारत ही जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असून लवकरच जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयाला येईल असा विश्वास गोयल यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. संविधानाच्या कलम ६६ (१) नुसार लोकसभा आणि राज्यसभेचे सर्व सदस्य उपराष्ट्रपतींची निवड करतात.

जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यामुळे उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक घेण्यात येत असून निवडणुकीची अधिसूचना लौकरच प्रसिद्ध होईल असं निवडणूक आयोगाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

झारखंडच्या दुर्गम भागातल्या ६ गावांना दत्तक घेऊन त्यांना प्राथमिक आरोग्य आणि वैद्यकीय सेवा पुरवल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी  एम्स देवघरचं कौतुक केलं आहे.

त्या आज एम्स देवघर च्या पहिल्या दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

<><><>

कृष्णा नदीवरच्या अलमट्टी धरणाची उंची वाढवू नये, यासाठी कर्नाटक सरकारला निर्देश द्यावेत, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केंद्राला केली आहे. याबाबत त्यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांना विस्तृत पत्र पाठवलं आहे.

या धरणाची उंची वाढवली तर महाराष्ट्रातल्या सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांसह, कृष्णा नदी काठच्या परिसराला फटका बसू शकतो. अलमट्टी धरणाच्या बॅक वॉटरमुळे निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीबाबत शास्त्रीय पद्धतीनं अभ्यास करण्याचं काम महाराष्ट्र शासनानं रुरकीच्या नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ हायड्रोलॉजी यांच्याकडे सोपवलं आहे. याबाबतचा अहवाल अजून प्राप्त झालेला नाही, तोवर या धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय विवेकी ठरणार नाही, असं फडनवीस यांनी या पत्रात म्हटलं आहे.

<><><>

म्यानमां मधे NDSC म्हणजे राष्ट्रीय संरक्षण आणि सुरक्षा मंडळानं नवीन सरकारची स्थापना केली असून आणीबाणी संपुष्टात आल्याचं जाहीर केलं आहे. "यु न्यो" हे नवे प्रधानमंत्री असतील असं स्थानिक नभोवाणी आणि दूरचित्रवाणी वाहिनीवर जाहीर झालं आहे. राष्ट्रीय संरक्षण आणि शांति आयोगाची देखील स्थापना करण्यात आली असून सीनियर जनरल मिन आँग लैंग त्याचे अध्यक्ष आहेत. सर्वोच्च सार्वभौमअधिकार संरक्षण दल प्रमुख झाउ मिन तुन यांच्या हवाली करण्याचा निर्णयही NDSC ने घेतला आहे.

<><><>

रशियानं आज सकाळी कीव शहराच्या काही भागात क्षेपणास्त्र आणि ड्रोनच्या सहाय्यानं हल्ले केल्याचं युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. या हल्ल्यात ८ जणांचा मृत्यू झाला असून ८८ जण जखमी झाले आहेत.

<><><>

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अंतिम सामन्यात भारताची फलंदाजी गडगडली आहे. आज लंडनच्या ओव्हल मैदानावर सुरू झालेल्या या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. मात्र

भारताची सुरुवात खराब झाली. संघाच्या अवघ्या १० धावा झाल्या असताना सलामीवीर यशस्वी जैस्वाल २ धावांवर बाद झाला. के एल राहुल १४, तर कर्णधार शुभमन गिल २१ धावा काढून तंबूत परतला.

भारताच्या ३ बाद ८५ धावा झाल्या असताना पावसामुळे खेळ थांबला.

<><><><>

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या थरुन मन्नेपल्ली आणि लक्ष्य सेन यांनी पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. भारताच्या आयुष शेट्टी याला मात्र मलेशियाच्या जस्टीन होह याच्याकडून पराभव पत्करावा लागला.

<><><><>

स्टारलिंक कंपनीला भारतात उपग्रह इंटरनेट सेवा सुरू करण्याचा परवाना मिळाला असून स्पेक्ट्रम वाटपासाठी एक नियामक चौकट तयार आहे, असं केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज नवी दिल्लीत एका कार्यक्रमात सांगितलं.

//<><><><>//